MHTH170003582026

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०/२०२६ मधील नि.१ वर आदेश

(यशोदा देवी उर्फ यशोदा वर्मा व इतर २ विरुध्द निरंक)

१. सदर अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे हेअरशिप सर्टीफीकेट (वारस प्रमाणपत्र) मिळण्यासाठी करण्यात आला आहे. अर्जदार यांचे कथन असे की, अर्जदार क्र. १ चे पती, अर्जदार क्र.२ व ३ चे वडील सियाराम रामअजोर वर्मा हे दिनांक १८/०६/२००५ रोजी पालघर येथे मयत झाले. ते परिवारासह पालघर येथे राहत होते. मयत सियाराम रामअजोर वर्मा यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांच्याशिवाय अन्य कोणतेही वारस नाही. अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामकाजासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. सबब, मयत सियाराम रामअजोर वर्मा यांचे वारस म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस दाखला देण्याची विनंती केली आहे.

२. मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या सिविल मॅन्युअल चॅप्टर १९ पॅ. ३३७ प्रमाणे वारस दाखल्याच्या बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ मधील अर्जाबद्दल ज्युडिशिअल इन्क्वायरी करणे अपेक्षित आहे. तसेच फक्त हेअरशिप सर्टीफिकेटमार्फत मयताच्या मिळकतीत कोणताही मालकी हक्क उद्घोषीत होत नाही असा कायदा आहे.

३. सदर अर्जाबद्दल वर्तमानपत्रात जाहीर नोटीस काढुन व जाहीरनामा उद्घोषित करुन, अर्जाबद्दल आक्षेप असल्यास कोर्टात हजर करण्याचा हुकूम पारित करण्यात आला. तसेच मयत यांच्या हिंदु वारसा कायद्याप्रमाणे वारसांबद्दल माहिती देण्यास अर्जदार यांस निर्देश देण्यात आला. त्याप्रमाणे ''पुण्य नगरी'' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०२/०२/२०२६ रोजी जाहीर नोटीस (निशाणी ९) काढण्यात आली. निशाणी ०६ सोबत असलेला जाहिरनामा बेलिफ रिपोर्ट प्रमाणे दिनांक ०९/०२/२०२६ रोजी बजावण्यात आलेला आहे. असे असूनही अद्याप कोर्टासमक्ष, सदर अर्जास इतर कोणतेही आक्षेप सादर नाही.

४. न्यायालयासमोर असलेल्या सदरच्या अर्जास अर्जदार क्र. १ यशोदा देवी उर्फ यशोदा सियाराम वर्मा यांचे अर्जास पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र (नि. १/अ) दाखल आहे. मयत सियाराम रामअजोर वर्मा यांच्या मृत्यू दाखल्याची प्रमाणित प्रत (नि.०३/२ कडे) दाखल आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सियाराम रामअजोर वर्मा हे दिनांक १८/०६/२००५ रोजी पालघर येथे मयत झाले होते. तसेच,

अर्जदार यांच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत (नि.३/१ कडे) व रेशनकार्डची फोटोकॉपी (नि.३/३ कडे) सादर केले आहे. तसेच अर्जदार क्र. ३ रवि वर्मा यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.१० कडे), साक्षीदार चंद्रप्रकाश कालीदिन वर्मा यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.११ कडे) सादर केले आहे. अर्जदार क्र. ३ रवि सियाराम वर्मा यांनी त्यांचे आजी व आजोबा मयत झाल्याबाबत प्रतिज्ञापत्र (नि.१२ कडे) दाखल केले आहे. पुरावा बंदची पुरसीस नि.१३ कडे दाखल आहे.

५. पुराव्याचे प्रतिज्ञापत्रांचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सियाराम रामअजोर वर्मा हे दिनांक १८/०६/२००५ रोजी पालघर येथे मयत झाले आहेत. मयत सियाराम रामअजोर वर्मा हे हिंदू वैवाहित पुरुष असल्याने, त्यांच्या मरणोत्तर त्यांची मरणसमयी जिवीत असलेले पत्नी, मुले, मुली व आई हे हिंदू कायद्याप्रमाणे त्यांचे वारसदार ग्राह्य धरले जातात. म्हणून सादर केलेला पुरावा पाहता, जिवीत मुले व पत्नी या नात्याने सदर अर्जामार्फत अर्जदार हे मयत सियाराम रामअजोर वर्मा यांचे वारस असल्याबद्दलचा पुरावा दिला असल्याने ते मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. सबब,

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत सियाराम रामअजोर वर्मा यांचे वारस असल्याबद्दलचा दाखला/ हेअरशिप सर्टीफीकेट देण्यात यावे.

३. याद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे की, निव्वळ या दाखल्यामार्फत अर्जदार यांना मयताच्या कोणत्याही मिळकतीत मालकी हक्क मिळणार नाही.

४. संदर्भित कायदेशीर शुल्क अर्जदार यांनी अदा करणे.

५. अर्ज या प्रमाणे निकाली काढण्यात येत आहे.

PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Digitally signed by PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Date: 2026.03.16 18:33:53 +0530

दिनांक : १६/०३/२०२६. (श्रीमती. पी. एस. जी. चाळकर)

ठिकाण : पालघर २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पालघर

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

Name of Stenographer	---	Suraj S. Saddiwal
Court	---	2nd Jt.CJJD & JMFC, Palghar
Date	---	16.03.2026
Order signed by the Presiding Officer on	---	16.03.2026
Order uploaded on	---	17.03.2026